दिनांक.०२/०९/२०१८

# प्रेसनोट

## वाहन चोरी करणारे अटकेत

## ६ मोटार सायकली कि.रु २,६८,०००/- मुद्देमाल जप्त

दि.३०/०८/२०१८ रोजी **भारती विद्यापिठ पोलीस ठाणे** हददीत वाहन चोरीच्या व घरफोडी गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड व कर्मचारी पेट्रोलींग करीत असताना **पोलिस कर्मचारी प्रदीप गुरव व प्रणव सकपाळ** यांना माहीती मिळाली की, दोन इसम कात्रज तळयाशेजारी बसस्टॉपवर थांबलेले असुन त्यांनी सुमारे १ आठवडयापुर्वी रात्रीच्या वेळी स.नं १६/७ आंबेगाव येथील शिवम बियर शॉपीसमोर पार्क केलेली हिरो होंडा मोटार सायकल रात्रीच्या वेळी चोरी केलेली आहे.सदरची गाडी चोरणारे दोन इसम हे कात्रज तलावाजवळ येणार आहेत अशी माहीती मिळाल्याचे आम्हांस कळविलेनंतर लागलीच आम्ही सदरची बातमी मा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केलेनंतर लागलीच आम्ही स्टाफ, असे खाजगी वाहनाने रवाना होवुन कात्रज तळयाशेजारील बसस्टॉप जवळ जावुन वॉच केला असता बातमीतील वर्णनाचे दोन्ही इसम पीएमटी बसस्टॉप शेजारी संशयीत रित्या वावरत असताना दिसलेने त्यांना आम्ही हटकले असता ते पळुन जाणेचा प्रयत्न करु लागल्याने त्यांना वरिल स्टाफचे मदतीने पकडुन त्यांना त्यांचा नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचा नाव पत्ता **१).लखन संजय आसवरे वय. २० वर्ष रा.विठठल तांबे यांचे घरामध्ये भाडयाने घोरपडे वस्ती लोणी काळभोर ता हवेली जि.पुणे २).रमजान इस्माईल शेख १९ वर्ष रा.कन्या शाळेजवळ लोणी काळभोर ता हवेली जि.पुणे** अशी असल्याचे सांगितले. नंतर त्यांना पोलीस ठाणे येथे त्यांना विश्वासात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता तपासदरम्यान त्यांनी सांगितले की, आम्ही दोघे तसेच आमचा तिसरा एक अल्पवयीन साथीदार असे तिघांनी सुमारे ८ दिवसापुर्वी रात्रीच्या वेळी आंबेगाव पठार येथील एका बियर शॉपीसमोरुन हिरो होंडा स्पेलेंडर मोटार सायकल ही चोरी केलेली आहे असे सांगितलेनंतर त्यास दाखल गुन्हयात अटक करुन तपासादरम्यान त्याचेकडून एकुण ६ मोटार सायकल कि.रू.२,६८,०००/- च्या अशा जप्त करण्यात आल्या आहेत.

वरील आरोपीकडून भारती विद्यापिठ पोलिस स्टेशन कडील २,व कोंढवा पोलिस स्टेशन,सिंहगड पोलिस स्टेशन,वानवडी पोलीस स्टेशन,दौंड पोलीस स्टेशन कडील प्रत्येकी १ असे एकुण ६ गुन्हे उघडकीस आले. आहेत.त्याचा अधिक तपास चालु असून आणखी वाहने चोरल्याचे ते सांगत आहेत.अधिक तपास **तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.**

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवलदार विनोद भंडलकर,श्रीधर पाटील,गणेश सुतार,प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड,समीर बागसिराज,दत्तात्रय पवार,सुमित मोघे यांचे पथकाने केलेली आहे.**